**धर्मादाय संघटनेच्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला या कार्यालयातील शिपाई, गट-ड या संवर्गातील पुनर्जिवीत केलेले पद निरसित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विधि व न्याय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-सीएचए-२०२५/प्र.क्र.८१/का-१ (ई-१३५७९९२)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ मे, २०२६

**पहा :**

विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सीएचए-२०२५/प्र.क्र.८१/का-१ दि.०१.१०.२०२५

**प्रस्तावना :**

श्री. विनोद मोहन संकत यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी धर्मादाय संघटनेच्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला या कार्यालयातील मृत संवर्ग घोषित केलेले गट-ड मधील 'शिपाई' पद पुनर्जिवीत करण्यास उपरोक्त शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांच्या दि.३०.०९.२०२५ च्या आदेशान्वये श्री. संकत यांना जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांच्या आस्थापनेवर स्वच्छक (गट-ड) (वेतनस्तर S-१ : १५०००-४७६००) या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात आली असून श्री. संकत हे जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे स्वच्छक पदावर दि.०३.१०.२०२५ रोजी रुजू झाले आहेत. श्री. संकत हे जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांच्या आस्थापनेवर रुजू झाल्यामुळे, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला या कार्यालयातील पुनर्जिवीत केलेल्या शिपाई पदाचे कोणतेही प्रयोजन राहत नाही. सबब, सदर पुनर्जिवीत केलेले शिपाई पद निरसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

धर्मादाय संघटनेच्या सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला या कार्यालयातील शिपाई, गट-ड या संवर्गातील पुनर्जिवीत केलेले पद निरसित करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक क्रमांक **२०२६०५१८१२५०२२३२१२** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

SUJIT DEVIDAS BORKAR

Digitally signed by SUJIT DEVIDAS BORKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=5A2DA98647916B7E9855A22ECA1DDE333B089C86282054EEACBD978B2B81A017, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7704308B7FF87C4C3453297E5225CAF5D9849C4CFFB77ACCF2B2FE315202A47B, cn=SUJIT DEVIDAS BORKAR
Date: 2026.05.18 12:51:06 +05'30'

**(सुजित बोरकर)**
**सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा. राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. महालेखापाल (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता-१/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
६. लेखा संचालक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. धर्मादाय सह आयुक्त, अमरावती.
८. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग, अकोला.
९. विधि व न्याय विभाग (का.१७/२३/२४/२५)
१०. निवडनस्ती/कार्या-१